# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ - अपील क्र. बीएम- २५२२/२०१५**

**अपिलार्थी श्री. मोहम्मद हमीद शेख**
राजीव नगर, सुलभ शौचालयाच्या बाजूला, संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा (पूर्व), मुंबई – ५१

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी (कार्या-२७)**
कामगार आयुक्त, उपनगर पश्चिम यांचे कार्यालय, कामगार भवन, ई ब्लॉक, सी-२०
बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई - ५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
कामगार उप आयुक्त, उपनगर पश्चिम यांचे कार्यालय, कामगार भवन
ई ब्लॉक, सी-२०, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई - ५१.

State Information Commission Greater Mumbai

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०३.२०१६</u>**
अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २९.०१.२०१५ | १८.०२.२०१५ | १०.०३.२०१५ | |

अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-६(१) खाली दि. २९.०१.२०१५ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहिती अर्ज सादर केला. सदर अर्जात त्यांनी, दि. ०१.०४.२०१३ ते अर्ज दिनांक या कालावधीतील कामगार उप आयुक्त, मुंबई पश्चिम उपनगर कार्यालय, कामगार भवन, बांद्रा यांच्या हद्दीत जे बांधकाम व्यावसायिक आहेत, त्यांच्याकडे असणाऱ्या कामगारांची कोणकोणत्या बांधकाम व्यावसायिकांनी नोंद केली आहे, त्या नोंद केलेल्या बांधकाम व्यावसायिकांच्या सर्व कागपत्रांच्या छायांकित प्रतीसह, सी.टी.सर्वे क्रमांसहीत माहिती तसेच ज्या बांधकाम व्यावसायिकांनी त्यांच्या कामगारांची नोंद केली नाही, त्या बांधकाम व्यावसायिकांवर कार्यालयामार्फत कोणती कार्यवाही केली, त्यांच्या सी.टी.सर्वे क्रमांसहीत माहितीची मागणी केली होती.

जन माहिती अधिकाऱ्याने दि. १८.०२.२०१५ रोजीच्या पत्रासोबत, सहाय्यक कामगार आयुक्त, मुंबई उपनगर (पश्चिम) कार्यालय, बांद्रा यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपीलकर्त्यास पाठविली. सदर पाठविण्यात आलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, प्रपत्र "अ" मध्ये जोडलेल्या बांधकाम व्यावसायिकांनी त्यांच्या कामगारांची नोंद केलेली आहे. नोंद केलेल्या बांधकाम कामगार व्यावसायिकांच्या सी.टी. सर्व्हे नंबर कार्यालयाच्या अधिपत्याखाली येत नाही. बांधकाम कामगारांची नोंदणी करताना व्यावसायिकांकडे ९० दिवसापेक्षा जास्त दिवस काम केल्याचा पुरावा म्हणून नियोक्त्याचे प्रमाणपत्र घेण्यात येते. बांधकाम क्षेत्रातील जास्तीत जास्त कामगार नोंदीत करण्याबाबत कार्यालयाकडून प्रयत्न केले जात आहेत. तथापि, कार्यालयास बांधकाम कामगारांची नोंदणी केली नाही म्हणून अशी एकही तक्रार प्राप्त झाली नाही. तसेच ज्या बांधकाम व्यवस्थापकांनी त्यांच्या बांधकाम कामगारांची नोंदणी केली नाही त्याची माहिती उपलब्ध नसल्यामुळे माहिती देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपीलकर्त्याने दि. १०.०३.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

अपीलकर्त्यास अपेक्षित माहिती मिळाली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दि. ०३.०७.२०१५ रोजी व्दितीय अपील दाखल केले. त्यात त्यांनी असा उल्लेख केला आहे की, प्रथम अपिलाची सुनावणी घेतली नाही.

व्दितीय अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्याने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकाऱ्यांकडून कोणतीही अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही. तसेच, प्रथम अपिलाची सुनावणी व निर्णय झाला नाही.

जन माहिती अधिकाऱ्याने असे विशद केले की, अपिलार्थींना अपेक्षित असलेली माहिती दि. १८.०२.२०१६ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थींना अपेक्षित माहिती. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनीदेखील त्यांची ही कार्यवाही ग्राह्य धरून प्रथम अपील निकाली काढले आहे. प्रथम अपिलाचा दि २१.०५.२०१५ अन्वये अपिलार्थींना कळविण्यात आला. तसेच आयोगाने सूचविल्याप्रमाणे विशेष मोहीम कालावधीमध्ये अपिलार्थींना सदर माहिती देण्याच्या दृष्टीने दि. ०४.०१.२०१६ रोजी बोलाविण्यान आले होते. तथापि ते उपस्थित राहिले नाहीत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, अपीलकर्त्यांनी प्रथम अपील सुनावणीच्या वेळी अपील अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांना माहितीची ५०० पृष्ठे हवी आहेत आणि संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांवर शास्ती व त्यांना झालेल्या खर्चाचा मोबदला मिळावा

म्हणून त्यांची मागणी आहे. तसेच, आयुक्त यांनी तत्काळ निर्णय द्यावा म्हणून त्यांनी आयुक्त यांच्याशी सुनावणीच्या वेळी हुज्जत घातली. सकृतदर्शनी जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. कामगार विभागाचा संबंध बांधकाम व्यावसायिकांनी केलेल्या कामगारांच्या नोंदणीशी आहे. जी माहिती त्यांना मिळाल्याचे त्यांनी मान्य केले. ते कोणत्या सिटी सर्व्हे नंबरचे बांधकाम करतात ही माहिती निश्चितपणे त्या विभागाशी संबंधित नसून संबंधित विकास प्राधिकरणाकडे असणे अपेक्षित आहे. आयोगाने अपिलार्थींच्या एकंदरीत वर्तन व व्यवहाराची नोंद घेतली असून, आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**अपील अमान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.**

अजित कुमार जैन

**(अजित कुमार जैन)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २८.०३.२०१६**

State Information Commission Greater Mumbai